# मुद्दा क्र १
# कलम ४(१) (ख) (I)
# रचना, कार्य व कर्तव्ये यांचा तपशिल


मुंबई येथील आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयातील कार्य व कर्तव्य यांचा तपशील.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २ | पत्ता | ४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई-४०० ००१ |
| ३ | कार्यालय प्रमुख | मा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष |
| ४ | कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त कार्यालय | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ५ | भौगोलिक कार्यक्षेत्र | महाराष्ट्रातील सर्व शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी /योग व निसर्गोपचार महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये |
| ६ | विभागाची ध्येय, धोरणे व प्रत्यक्ष कार्य | वैद्यकीय शिक्षण, आयुष (AYUSH) (आयुर्वेद, योग, युनानी, सिध्द, योग व निसर्गोपचार व होमिओपॅथी चिकित्सापध्दत) या विभागाकडून राज्यातील जनतेस प्राथमिक आरोग्यासह औषधोपचार, विशेषोपचार व अतिविशेषोपचार सेवा देण्यात येते.<br>या विभागाच्या अधिनस्त वैद्यकीय सेवा व व्यवसाय या संदर्भातील कायद्याची अंमलबजावणी करणे, मानवी जीवनाच्या प्रक्रियेमध्ये मानवाच्या शारिरिक, मानसिक, जन्मजात निर्माण होणारे आजार, अपघात, हवामानातील होणाऱ्या बदलामुळे निर्माण होणारे संसर्गजन्य रोग इ. निर्माण होणाऱ्या आजारावर मात करुन मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी वैद्यकीय क्षेत्राशी निगडित संशोधन, उपाय योजना, वैद्यकीय शिक्षण, औषध निर्मिती व आनुषंगिक कायदे, या प्रयोजनार्थ आवश्यक वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळ निर्माण करणे तसेच राज्यात वैद्यक शास्त्रात समतोल विकास साधणे व वैद्यक शाखेतील विविध अभ्यासक्रमात एकरुपता आणणे इ. संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेतले जातात. |


| | | |
|---|---|---|
| | | आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई या कार्यालयांतर्गत आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच निसर्गोपचार व योगोपचार इत्यादी भारतीय वैद्यकशास्त्राच्या शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे नियमन व नियंत्रण करणे, भारतीय वैद्यकशास्त्राचा प्रचार व प्रसार इत्यादी कामे आयुष संचालनालयाकडून केली जातात. राज्यात सध्या ५ शासकीय आयुर्वेद महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये व १ शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय असून, १६ आयुर्वेद व ३ युनानी महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांना शासनाकडून अनुदान दिले जाते. याशिवाय ६९ आयुर्वेद, ४ युनानी व ५५ होमिओपॅथी महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये खाजगी संस्थांमार्फत चालविली जात असून त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारे आर्थिक मदत / अनुदान दिले जात नाही. |

या संचालनालयातर्फे खालीलप्रमाणे यंत्रणा व कार्यप्रणाली राबविण्यात येते.


प्रारुप तक्ता



संचालनालय – प्रारुप तक्ता



संचालनालयातील कार्यासन-



कार्यासनातील कामाचे विस्तृत स्वरुप

| अ.क्र. | कार्यासन | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | कार्यासन आयु २ - शैक्षणिक विभाग | १) राज्यातील सर्व शासकीय व खाजगी आयुर्वेद तसेच युनानी महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांचेवर नियंत्रण<br>२) विनाअनुदानित, अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांचे तसेच अशासकीय संस्थांचे (एन.जी.ओ.) केंद्रीय अनुदान प्रस्ताव सादर करणे, केंद्र शासनाचे मंजुरी प्राप्त झाल्यावर पुरवणी मागणी सादर करणे व वितरित केलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन केंद्र शासनास सादर करणे.<br>३) पदव्युत्तर आयुर्वेद अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सक्षम अधिकारी म्हणून काम पाहणे.<br>४) जिल्हा परिषद आयुर्वेद व युनानी दवाखान्यांची माहिती ठेवणे.<br>५) नवीन आयुर्वेद / युनानी महाविद्यालयांचे प्रस्तावांचे काम.<br>६) रुग्णशुल्क, रसशाळेसाठी कच्ची औषधी द्रव्ये व किंमती ठरविणे.<br>७) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये आयुष घटकांची योजना राबविणे.<br>८) विद्यार्थी विद्यावेतन.<br>९) संचालक आयुष कार्यालयांर्गत अधिनस्त कार्यालयासाठी किरकोळ स्टेशनरी खरेदी मागणी पत्रे पाठविणे.<br>१०) वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवठा करणे.<br>११) केंद्रीय आयुर्वेद / होमिओपॅथिक परिषदेच्या निवडणुकीचे कामकाज.<br>१२) वरील विषयाशी निगडित न्यायालयीन प्रकरणे |
| २ | कार्यासन आयु -३ | १) गट-अ व गट-ब संवर्गाच्या सेवा विषयक बाबी<br>२) गट-अ व गट-ब संवर्गाची न्यायालयीन प्रकरणे<br>३) गट-अ व गट-ब संवर्गाची सामाजिक व दिव्यांग आरक्षण बिंदू नामावल्या तयार करणे<br>३) गट-अ व गट-ब संवर्गाची सरळसेवा व पदोन्नतीचे प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करणे. |
| ३ | कार्यासन आयु -४ | लेखाविषयक सर्व कामकाज- मासिक वेतन, बजेट, विविध शासकीय अग्रिमे, खर्चताळमेळ, वार्षिक योजना, कार्यक्रम अंदाजपक, पुरवणी मागणी, मोठी व लहान बांधकाम विषयक प्रस्ताव, तांत्रिक मान्यता, खरेदीस मान्यता देणे, स्वीय प्रपंजी लेखा खाते, ई-निविदा प्रक्रिया, विनियोजन लेखे इ., संचालनालय व संचानालयाचे अधिनस्थ संस्थाचे कामकाज शासनास सादर करणे. तसेच रु.३.०० ते १०.०० लाख |

| | | |
|---|---|---|
| | | रक्कमेपर्यंतच्या यंत्रसामुग्री व साधन सामुग्री खरेदीसाठी खरेदी समितीचे गठन करणे. |
| ४ | कार्यासन आयु -५ | या संचालनालयाच्या अधिन्स्त असलेल्या सर्व शासकीय/शासन अनूदानीत व खाजगी संस्थांचे अंतर्गत लेखा परिक्षण करुन वित्तिय नियकमततेवर नियंत्रण ठेवणे तसेच महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, दक्षता पथक, भांडार पडताळणी पथक आणि स्थानिक निधी लेखा यांनी उपरोक्त संस्थांच्या लेखा परिक्षणात घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करणे. |
| ५ | कार्यासन आयु -६ | १) गट क व गट - ड संवर्गाच्या सेवा विषयक बाबी<br>२) नवीन पदांचा निर्मिती प्रस्ताव<br>३) संचालनालयाच्या अधिनस्त सर्व पदांचा आढावा<br>४) संचालनालयाच्या अधिनस्त सर्व पदांचा आकृतीबंध<br>५) अस्थायी पदांना मुदतवाढ प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करणे<br>६) गट क व गट ड कर्मचाऱ्यांची न्यायालयीन प्रकरणे<br>७) संचालनालयाच्या अधिनस्त गट-क व संचालनालयातील गट- ड संवर्गाची भरती प्रक्रिया राबविणे<br>८) गट -क व गट -ड संवर्गाच्या पदोन्नत्या करणे<br>९) गट -क संवर्गाची सामाजिक व दिव्यांग आरक्षण बिंदू नामावल्या तयार करणे<br>१०) गट क कर्मचाऱ्यांच्या तक्रारी व विभागीय चौकशी प्रकरणे |
| ६ | कार्यासन आयु ७ - सहायक अनुदान विभाग | खाजगी शासन अनुदानित महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील शासनमान्य पदांना शासनाकडून मंजूर होणाऱ्या सहाय्यक अनुदानाचे तदर्थ स्वरुपात अनुदानाचे वितरण विभागीय सहाय्यक संचालक आयुष याचे कार्यालयामार्फत होणाऱ्या कामकाजाचे कार्यासन आयु-७ कडून नियंत्रण केले जाते. संस्थेचे आर्थिक वर्षातील मान्य खर्चाचे अंतिम निर्धारण अहवाल तपासणीअंती शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. संस्थेतील शिक्षक पदांचे मान्यतेबाबत व शिक्षकेत्तर पदांचे, अनुकंपा, लाड पागे तत्वावरील नियुक्तीस मान्यता प्रदान केल्या जातात. तसेच न्या. निर्णयानुसार संबंधित नियमाप्रमाणे लाभ मंजूरीचे कामकाज शासनाशी समन्वय ठेऊन केले जाते. |
| ७ | कार्यासन आयु -८ | या संचालनालयांतर्गत असलेले राज्यातील सर्व शासकीय कार्यालय व वर्ग-३,वर्ग-२,वर्ग-१ अधिकारी व कर्मचारी आणि खाजगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालये व रुग्णालयांमधील वर्ग-१, वर्ग-२ अधिकारी यांनी न्यायालयात दाखल केलेली विविध प्रकारची न्यायालयीन प्रकरणामध्ये शपथपत्र दाखल करण्याकरीता सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | घेउन अभिप्राय तथा मसुदा प्रारुप शपथपत्र संबंधीत सरकारी वकील कार्यालय व मुख्य सादरकर्ता अधिकारी कार्यालय यांचेकडे शपथपत्र सादर करण्याकरीता पाठविण्यात येतात. यासाठी संबंधीत प्रादेशिक कार्यालयातील जबाबदार अधिकारी यांना शपथपत्र सादर करण्याकरीता पाठविण्यात येते. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई व खंडपीठ औरंगाबाद तथा नागपूर आणि मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ औरंगाबाद तथा नागपूर तसेच गोवा आणि मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली या कार्यालयाना पत्राद्वारे संपर्क करण्यांत येतो. |
| ८ | कार्यासन आयु -९ | समन्वय - विधानमंडळ कामकाज नियमावली व माहितीचा अधिकार अधिकार अधिनियम २००५ |